Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# सावित्रीबाई फुले यांची शैक्षणिक आणि सामाजिक चळवळ

**यमुना चंद्रकांत ढेंबरे**
संशोधक विद्यार्थिनी (पीएचडी.)
जालना समाजकार्य महाविद्यालय, जालना.
dhyamuna@gmail.com

**प्रस्तावना:**

सावित्रीबाई ज्योतिराव फुले जन्म ३ जानेवारी इसवी सन १८३१ ,मृत्यू 10 मार्च इसवी सन १८९७. या एक भारतीय समाज सुधारक ,शिक्षण तज्ञ आणि कवियत्री होत्या .भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्री वादाची जननी मांनले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्रीशिक्षणाचे प्रणेते आहेत. या दोघांनी एक जानेवारी 1848 रोजी पुणे येथील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा देशातील पहिली शाळा होती. तत्पूर्वी अमेरिकन मिशनरी सिंथीया फरार यांनी 1829 मध्ये मुंबईत मुलींची शाळा सुरू केली होती.

**सामाजिक चळवळीतील सावित्रीबाईंचे कार्य:**

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपण थांबवण्यासाठी पुण्यात ना व्यांचा संप घडवून आणला होता. सावित्रीबाई एक लेखिका सुद्धा होत्या. त्यांनी मराठी भाषेत मोठ्या प्रमाणात लेखन केले होते. इसवी सन 1897 मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले .या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. 10 मार्च 1897 रोजी त्यांचा मृत्यू झाला.

तीन जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. दहा मार्च 1998 रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. 2015 मध्ये यांच्या सन्मानार्थ नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे

करण्यात आले. 3 जानेवारी 2025 रोजी सावित्रीबाई फुले यांचा 194 वा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात आला असून अभिवादन केले .

**सावित्रीबाई यांच्या शैक्षणिक कार्य:**

1 जानेवारी इसवी सन 1848 रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ज्योतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची पहिली शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहा नंतर शिक्षण घेऊन त्या पहिल्या शिक्षिका झाल्या. पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी शिक्षण देण्याचे कार्य केले. फुले दांपत्यांनी मिळून चार वर्षात 18 शाळा सुरू करून त्या चालवल्या देखील. ब्रिटिश राजवटीत भारतीय व्यक्तीने काढलेली ही पहिली शाळा होती. त्यांनी पुण्याच्या काही भागात दोन तीन शाळा काढून चालवल्या होत्या. मुंबईत देखील त्यांनी गिरगाव मध्ये स्टुडंट्स लिटरली अँड सायंटिफिक सोसायटीने कमळाबाई हायस्कूल नावाची मुलींची शाळा सुरू केली होती. सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला सहा मुली होत्या. परंतु 1848 वर्ष संपेपर्यंत त्यांच्या शाळेतील मुलींची संख्या जवळपास 40 ते 45 पर्यंत पोहोचली होती. त्यांच्या यशस्वी कार्याचे स्वागत समाजातील काही सनातनी लोकांनी धर्म बुडाला..... जग बुडणार..... कली आला..... असे सांगून केले. त्या कर्मठ सनातनी लोकांनी त्यांना प्रचंड विरोध केला. प्रसंगी सावित्रीबाईंच्या अंगावर शेणा मातीचे गोळे फेकले. परंतु सावित्रीबाई न डगमगता आपले शिकवण्याचे, शिक्षण प्रसाराचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले. अनेक आघात होऊही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. शिक्षणाचे कार्य घरातील लोकांना मान्य नव्हते .त्यामुळे सावित्रीबाईंना घर देखील सोडावे लागले होते.

याचबरोबर शिक्षण जसे गरजेचे आहे अगदी त्याचप्रमाणे इतर क्षेत्रातही सामाजिक कार्य करणे आवश्यक आहे हे त्यांनी जाणले होते .समाजातील काही जाचक रूढी,प्रथा, परंपरा यांना आळा घालने गरजेचे आहे. हे त्यांनी ओळखून बालविवाह, बाल जरट विवाह यावर आळा घातला. जरट विवाहामुळे छोट्या वयाच्या मुली विधवा व्हायच्या. त्या बाल विधवांचे पुनर्विवाहासाठी सावित्रीबाईंनी मोलाचे कार्य केले आहे .पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावं लागत असे किंवा त्यांचे केशव पण केले जात असे. असे करून त्या विधवांना कुरूप बनवले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणीतरी नराधमाच्या शिकार बनत .गरोदर विधवा म्हणून मग समाज छळ करणार जन्माला येणाऱ्या मुलाला यातनाशिवाय काहीच मिळणार नाही. अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भरून हत्या करत.

ज्योतिरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक ग्रह सुरू केले. सावित्रीबाईंनी प्रतिबंधक ग्रह समर्थपणे चालवले. फसवणुकीने व बलात्काराने गरोदर राहिलेल्या या विधवांचे त्या बाळांतपण करत असत. संस्थेतील सर्व मुलांना त्या स्वतःची मुले मनात असत. याच ठिकाणी जन्मलेल्या ब्राह्मण विधवेच्या काशीबाई यांचे मूल दत्तक म्हणून घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी शर्तीचे प्रयत्न केले. सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी खंबीरपणे वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून केला . काव्यफुले,व बावनकशी, सुबोधरत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पोटासाठी शरीर विक्री करणाऱ्या बाया बापड्या ना दृष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास आणले. पुढे पंडिता रमाबाई ,गायकवाड सरकार अशा लोकांनी त्यांना सहकार्य केले.

इसवीसन 1896 साला दरम्यान पुण्यामध्ये प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला होता. अनेक लोक प्लेगच्या विळख्या सापडले होते. सावित्रीबाईंनी स्वतःच्या जीवाची परवा न करता ससाने माळावर दवाखाना सुरू केला. स्वतः रुग्णांची देखभाल व सेवा करू लागल्या. याच दरम्यान सावित्रीबाई देखील प्लेगच्या विळख्यात येऊन त्यांना प्लेग रोगाची लागण झाली. आणि त्या 10 मार्च इसवी सन १८९७ ला मृत्यू पावल्या.

सावित्रीबाई यांनी ज्योती रावांनी सती प्रथेला कडाडून विरोध केला होता .विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. विधवा आणि वंचित मुलांसाठी घर सुरू केले. सावित्रीबाईंनी स्त्री पुरुष भेदभाव जातीय भेदभाव यांना देखील कडाडून विरोध केला. अशा प्रकारे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीतील कार्य स्पष्ट केलेले आहे....

**संदर्भ: .**

1). कोठारी, विश्वास (8 जुलै 2014) द टाइम्स ऑफ इंडिया.

2) द हिंदू google doodly paystribut e to सोशल रेफॉर्मर सावित्रीबाई फुले.

3) महाराष्ट्र टाइम्स 2022 जानेवारी 3.

4) सावित्रीबाई फुले द पायोनियर ऑफ वुमन्स एज्युकेशन इन इंडिया 2024 जानेवारी 3

5) ई -सकाळ डब्ल्यू डब्ल्यू डॉट कॉम३ जानेवारी 2022 .

6)लोकसत्ता 3 जानेवारी 2022.

7) कामब्रिज युनिव्हर्सिटी.

8)सुंदरमन टी सावित्रीबाई फुले पहिले स्मृती व्याख्यान (2008) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद 2009 .

9)चॅलेंजिंग नोरमालाईज एक्सक्लूजन: ह्युमर अँड होप फुल रेशनालिटी इन dalit पॉलिटिक्स -वाघमोरे ,सूर्यकांत (2016) सेज पब्लिकेशन.